रेण्वीय निदान प्रयोगशाळा, सिंधुदुर्ग येथे
माकडताप आजाराचे निदान करण्याची सुविधा
निर्माण करण्यासाठी पदनिर्मिती करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः प्रशास्था २०१७/ प्रक्र.१८५/आरोग्य ३(अ)
१० वा मजला, संकुल इमारत,
जी.टी. रुग्णालय आवार,मंत्रालय, मुंबई - ४०० ००१.
दिनांक : २२ मार्च, २०१८.

वाचा :

१) संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांचे पत्र क्र.संआसे/कक्ष-६/रेण्वीय प्रयोगशाळा/ पद निर्मिती व यंत्रसामुग्री/ ३/२०१७, दिनांक-०८.१२.२०१७.

२) वित्त विभाग क्र.पदनि-२०१८/ प्रक्र-०५/१८/आ.पु.क दिनांक-२५.०१.२०१८

३) शासन निर्णय क्रमांक सार्वजनिक आरोग्य विभाग, -राप्रआ २०११/ प्रक्र-४२३/आरोग्य ३(अ), दिनांक- ३१.१०.२०१२.

प्रस्तावना :

राज्यामध्ये पुणे, औरंगाबाद, नागपूर, सिंधुदुर्ग व अमरावती या जिल्हयांत रेण्वीय निदान प्रयोगशाळा स्थापन करण्याचा निर्णय दिनांक ३१.१०.२०१२ रोजीच्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे. सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये माकडतापाचे रुग्ण मोठया प्रमाणात आढळून येत असल्यामुळे व सदर आजाराचे गांभीर्य विचारात घेता, तसेच सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पीय भाषणात मा.मंत्री वित्त यांनी दिनांक १८.०३.२०१७ रोजी विधानमंडळात केलेल्या अर्थसंकल्पीय भाषणाच्या अनुषंगाने डेंग्यू, चिकनगुनिया, जापनीज एन्सेफालायटीस, मेंदूज्वर, विषमज्वर, पटकी, घटसर्प, शिगेला डिसेंटरी, व्हायरल हेपॅटायटीस ए व ई, लेप्टोस्पायरोसिस या १० आजारांच्या बरोबरच माकडताप या आजाराचे निदान करण्याची सुविधा प्राधान्याने सिंधुदुर्ग येथील रेण्वीय प्रयोगशाळा कार्यान्वित करण्याकरिता पदनिर्मितीची बाब विचाराधीन होती. संचालक, आरोग्य सेवा यांच्या दिनांक ०८.१२.२०१७ च्या प्रस्तावाच्या अनुषंगाने उच्च स्तरीय सचिव समितीने दिलेलया मान्यतेस अनुसरुन रेण्वीय निदान प्रयोगशाळा, सिंधुदुर्ग येथे पदनिर्मिती करण्याची बाब विचाराधीन होती.याबाबत पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

शासन निर्णय:

राज्यातील पुणे, औरंगाबाद, नागपूर, सिंधुदुर्ग व अमरावती या जिल्हयांत रेण्वीय निदान प्रयोगशाळा स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला.सदर जिल्हयापैकी शासकीय रेण्वीय निदान प्रयोगशाळा, सिंधुदुर्ग साठी नियमित ८ पदे व ३१ काल्पनिक कुशल पदे निर्माण करण्यास व ६ अकाल्पनिक कुशल पदे बाहययंत्रणेव्दारे भरण्यास आणि सदर प्रयोगशाळा कार्यान्वित करण्यास मान्यता देण्यात येत आहे :-

२. नव्याने पदनिर्मिती करण्यास मान्यता देण्यात आलेल्या पदांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	पदनाम	वेतनश्रेणी	ग्रेड पे	निर्माण करावयाची पदे
अ)	नियमीत पदे			
१	मुख्य वैद्यकीय अधिकारी	१५६००-३९१००	६६००	१

अ.क्र.	पदनाम	वेतनश्रेणी	ग्रेड पे	निर्माण करावयाची पदे
अ)	**नियमीत पदे**			
२	वैद्यकीय अधिकारी	१५६००-३९१००	५४००	१
३)	प्रशासकीय अधिकारी-वर्ग-२	९३००-३४८००	४४००	१
४)	सांख्यिकी अन्वेषक	९३००-३४८००	४२००	१
५)	किटक समहारक	५२००-२०२००	२४००	१
६)	वरिष्ठ लिपिक	५२००-२०२००	२४००	२
७)	कनिष्ठ लिपिक/टंकलेखक	५२००-२०२००	२४००	१
	एकूण (अ)			८
ब)	**काल्पनिक कुशल पदे**			
१)	वैद्यकीय शास्त्रज्ञ(ब)मायक्रो	१५६००-३९१००	६६००	१
२)	अवैद्यकीय शास्त्रज्ञ(ब) मायक्रो	१५६००-३९१००	५४००	१
३)	मायक्रोबायोलॉलिस्ट	१५६००-३९१००	५४००	१
४)	व्हेटेनरी ऑफीसर	१५६००-३९१००	५४००	१
५)	एन्टॉमॉलॅजिस्ट	९३००-३४८००	४४००	१
६)	प्रयोगशाळा तंत्रज्ञ	९३००-३४८००	४२००	५
७)	आरोग्य सहायक	५२००-२०२००	२५००	१
८)	प्रयोगशाळा सहायक	५२००-२०२००	२०००	४
९)	कनिष्ठ लिपिक/टंकलेखक	५२००-२०२००	१९००	२
१०)	वाहनचालक	४४४०-७४४०	१९००	२
११)	प्रयोगशाळा परिचर	४४४०-७४४०	१३००	६
१२)	शिपाई	४४४०-७४४०	१३००	६
	एकूण (ब)			३१

क	**काल्पनिक अकुशल पदे**	
१	सफाईगार	**४**
२	पहारेकरी	**२**
२	एकुण	**६**

सदर प्रस्तावावरील खर्च **मागणी क्रमांक आर-१**,२२१० - वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य ०६-सार्वजनिक आरोग्य,१०७ सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा,(०१) (०१)-सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळांची स्थापना, (२२१० ०९८८) या लेखाशिर्षाखालील मंजूर तरतुदीमधून भागविण्यात यावा.

३. नियमीत पदांचे वेतन (०१- वेतन), काल्पनिक कुशल पदांवरील खर्च (१३- कार्यालयीन खर्च) व काल्पनिक अकुशल पदांवरील खर्च (१० - कंत्राटी सेवा) यामधून भागवावा.

४. मुख्य वैद्यकीय अधिकारी, रेण्वीय निदान प्रयोगशाळा,सिंधुदुर्ग यांना कार्यालय प्रमुख म्हणून घोषित करण्यात येत आहे.

५. काल्पनिक अकुशल (बाहययंत्रणेव्दारे काम करुन घेणे) पदांबाबत शासन परिपत्रक, वित्त विभाग, दि.०२ फेब्रूवारी, २०१३ व दि.०२ डिसेंबर, २०१३ मधील तरतुदींनुसार कार्यवाही करावी.

६. यापुढील पदनिर्मितीचे प्रस्ताव सादर करतांना विभागाच्या सुधारीत आकृतीबंधास (खुद्द व क्षेत्रीय) उच्चस्तरीय सचिव समितीची मान्यता घेणे आवश्यक असल्याने आयुक्त, आरोग्य सेवा यांनी त्याप्रमाणे शासनास प्रस्ताव सादर करावेत.

७. हा शासन निर्णय उच्च स्तरीय सचिव समितीच्या दिनांक १६.०१.२०१८ रोजी झालेल्या ७ व्या बैठकीमधील अध्यक्ष, उच्चस्तरीय सचिव समिती यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरुन निर्गमीत करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३१६१९००४९४०१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajendra Shamraoji Kaurte

Digitally signed by Rajendra Shamraoji Kaurte
DN: CN = Rajendra Shamraoji Kaurte, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Public Health Department
Date: 2018.03.22 16:38:01 +05'30'

(रा. शा.कौरते)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. महालेखापाल, महाराष्ट्र १/ २, (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/ नागपूर.
२. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
३. संचालक, आरोग्य सेवा, मुंबई.
४. सह संचालक, आरोग्य सेवा, (हि.ह.व ज.रो.), पुणे.
५. सह संचालक, आरोग्य सेवा, (अ व प्र.) मुंबई.
६. सर्व, आरोग्य सेवा मंडळ
७. उप संचालक,आरोग्य सेवा, राज्य सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा, पुणे.
८. जिल्हा शल्य चिकित्सक,सिंधुदुर्ग
९. जिल्हा कोषागार अधिकारी, सिंधुदुर्ग
१०. वित्त विभाग (कार्यासन- व्यय १३/ विसु १/आपुक), मंत्रालय, मुंबई.
११. नियोजन विभाग (कार्यासन १४७२), मंत्रालय, मुंबई.
१२. निवडनस्ती (आरोग्य ३अ)